**१५ व्या केंद्रिय वित्त आयोगाच्या शिफारसीनुसार पंचायत राजच्या तिन्ही स्तरांसाठी प्राप्त होणा-या निधीमधुन हाती घ्यावयाच्या कामांच्या संदर्भात कामकाजाचे सर्वसाधारण समन्वय व नियंत्रण करणेबाबत.**

शासन परिपत्रकक्रमांक-पंविआ-२०२०/प्रक्र-६२ /वित्त-४
ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई.
दि.१० ऑगस्ट, २०२०
संदर्भ - शासन निर्णय क्र. पंविआ-२०२०/प्रक्र-६२ /वित्त-४, दि.२७.७.२०२०

## परिपत्रक

१. १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशी अनुसरून राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी राज्याला मूलभूत / बेसिक अनुदान व बंधित अनुदान या दोन प्रकारच्या अनुदानाच्या स्वरूपात निधी देण्यात येणार आहे. त्यानुसार मूलभूत / बेसिक अनुदान व बंधित अनुदान या दोन प्रकारच्या अनुदानाच्या पहिल्या हप्त्याचे वितरण सर्व जिल्ह्यांना माहे जून २०२० आणि जुलै २०२० मध्ये करण्यात आलेले आहे.

२. पंधराव्या वित्त अंतर्गत वरील दोन प्रकारच्या अनुदानाच्या स्वरूपात प्राप्त होणाऱ्या निधीतून पंचायतराज संस्थांनी करावयाच्या बाबी ठरविणे, तसेच निधी खर्च करताना पंचायतराज संस्थांनी पालन करावयाची मार्गदर्शक तत्त्वे/सूचना, आणि विविध प्राधिकाऱ्यांची कर्तव्य आणि जबाबदाऱ्या या बाबत दि.२६.०६.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये सविस्तर आणि स्वयंस्पष्ट मार्गदर्शक सूचना यापूर्वीच निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

३. पंधराव्या वित्त आयोग अंतर्गत जिल्हास्तरावर प्राप्त झालेला निधी, प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १० कार्यालयीन कामकाजांच्या दिवसांच्या आत संबंधित पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती यांना हस्तांतरित होणे अनिवार्य आहे. निधी हस्तांतरणास विलंब झाल्यास सदर निधी, त्यावर मागील वर्षाच्या बाजार कर्जावरील व्याजदराने व्याज आकारणी करून त्यासह वितरित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

४. त्याचप्रमाणे संबंधित संस्थेस निधी प्रत्यक्ष प्राप्त झाल्यापासून दोन महिन्यांच्या आत अनुज्ञेय कामांच्या आराखड्यास समुचित सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेऊन त्यानंतर लगेचच कामांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगिक प्राथमिक प्रक्रिया पूर्ण केल्या जाऊन कामे पूर्ण होणे अपेक्षित आहे.

५. अशाप्रकारे पंधराव्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त निधीच्या जलद विनियोगासाठी क्षेत्रीय आणि पर्यवेक्षक पातळीवर सुयोग्य समन्वय आणि नियंत्रण असणे आणि सर्व जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या यांच्या कामकाजात सुसूत्रता आणि समानता असणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

   I. पंचायत संस्थांच्या जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायती या तिन्ही स्तरां साठी पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीच्या अनुषंगाने विनियोगाच्या नियंत्रणाची व समन्वयाची मुख्य जबाबदारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांची आहे. त्यामुळे पुढील काळात पंधराव्या वित्त आयोगासाठी जिल्हा परिषदेचा ग्रामपंचायत विभाग नोडल विभाग म्हणून कार्य करील.



Scanned with CamScanner

II. पंचायतराजच्या जिल्हा परिषद पंचायत समिती आणि ग्रामपंचायती या तीनही स्तरांसाठी अनुज्ञेय असलेले अनुदान आहरित करून अनुज्ञेयतेनुसार विहित कालमर्यादेत संबंधित संस्थेपर्यंत वितरित करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व अनुषंगिक कार्यालयीन प्रक्रिया उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांचेकडून पार पाडल्या जातील. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे पर्यवेक्षण करतील तर मुख्य कार्यकारी अधिकारी हे नियंत्रण ठेवतील.

III. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती स्तरासाठी चिन्हांकित असलेल्या १०% निधी मधून हाती घ्यावयाची अनुज्ञेय कामे आणि विकास परियोजना यांचे संदर्भात विविध कार्यान्वयीन यंत्रणा बरोबर समन्वय ठेवून, सर्वसमावेशक एकत्रित आराखडा तयार करून, तो विचारार्थ आणि अंतिम मान्यतेस्तव समुचित सक्षम प्राधिकरणाकडे सादर करणेबाबतची कार्यवाही जिल्ह्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नियंत्रणाखाली उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) आणि पंचायत समित्यांसाठी गट विकास अधिकारी यांचे नियंत्रणाखाली संबंधित सहाय्यक गटविकास अधिकारी, हे करतील.

IV. जिल्हा परिषद व पंचायत समिती या दोन्ही स्तरांसाठी पंधराव्या वित्त आयोगांतर्गत कामाच्या संदर्भात मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे वित्तीय नियंत्रक म्हणून कार्य करतील. वित्तीय सल्ला, प्रदानपूर्व लेखापरीक्षण आणि लेखांकन या बाबींशी निगडीत कामकाज महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ मधील तरतुदींस अनुसरून मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे नियंत्रण आणि मार्गदर्शनाखाली पार पाडले जाईल.

V. बंधित आणि मूलभूत अशा दोन्ही प्रकारच्या निधीवर प्राप्त होणाऱ्या व्याजाच्या रकमांचा निधी निहाय स्वतंत्र हिशोब ठेवणे, त्याबाबत अनुषंगिक माहिती अद्यावत ठेवणे, त्यात्या खात्यातील व्याज त्यात्या खात्यात जमा केले जाईल, आणि शासन निर्देशांनुसारच आणि विहित कार्यपद्धत अनुसरूनच त्याचा विनियोग अनुज्ञेय बाबींसाठीच होईल हे सुनिश्चित करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेसाठी मुख्य लेखा व वित्त अधिकारी, पंचायत समिती समिती साठी गट विकास अधिकारी आणि ग्रामपंचायतीसाठी ग्राम विकास अधिकारी / ग्रामसेवक यांची राहील.

VI. पंधराव्या वित्त आयोग अंतर्गत कामे आणि विकास परियोजना यांची अंमलबजावणी/ कार्यान्वयन करताना सर्व अनुषंगिक प्रचलित शासन नियम-विनियम दिशानिर्देश यांचे काटेकोर अनुपालन केले जाईल आणि विहित कार्यपद्धतीचा तंतोतंत अवलंब केला जाईल हे सुनिश्चित करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन अधिकारी / कर्मचारी आणि पर्यवेक्षीय अधिकारी यांची राहील. कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही प्रकारची अनियमितता, गैरप्रकार, दुर्विनियोजन घडणार नाही यासाठी समुचित प्रतिबंधात्मक आणि पर्यवेक्षीय उपाययोजना करणे आणि दक्षता बाळगणे संबंधित पर्यवेक्षीय अधिकारी यांचे साठी अनिवार्य राहील.

VII. शासन निर्देश आणि मार्गदर्शक सूचना यांचे काटेकोर अनुपालन करून विहित कालमर्यादेत कामे आणि विकास परियोजना यांची अंमलबजावणी जलद गतीने केली जाईल, यासाठी सर्व संबंधितांनी प्रत्येक टप्प्यावर योग्य ती खबरदारी घ्यावी. कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही प्रकारची हयगय, टाळाटाळ होणार नाही, निधीच्या खर्चाचा अनुशेष निर्माण होणार नाही, निधी विनावापर अखर्चित पडून राहणार नाही, निधीचा नियमोचीत विनियोग करण्यामध्ये अवाजवी विलंब होणार नाही, आवश्यक ती माहिती उपयोगिता प्रमाणपत्र आणि अहवाल शासनास विहित कालमर्यादेत अचूकरित्या आणि तत्परतेने सादर केले जातील,



Scanned with CamScanner

यासाठी सर्व पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांनी नियोजनबद्धरीतीने जाणीवपूर्वक आणि ठोस प्रयत्न करणे बंधनकारक राहील.

VIII. पंधराव्या वित्त आयोगांतर्गत पंचायत राज या तीनही स्तरांवरील कामे आणि विकास परियोजना यांचे नियोजन आणि अंमलबजावणी यावर प्रथम नियंत्रण उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), वित्तीय नियंत्रण मुख्य लेखा व वित्त अधिकारी (ग्रामपंचायत स्तर वगळून) आणि अंतिम नियंत्रण मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Pravin Jain

(प्रविण जैन)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त, कोकण/ नाशिक/पुणे/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद,
उप सचिव ( पंचायत राज ) ग्रामविकास विभाग, मुंबई.
निवडनस्ती कार्यासन वित्त - ४

प्रत माहितीसाठी,
मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव
मा.अतिरिक्त मुख्य सचिव (ग्रामविकास) यांचे स्वीय सहायक

Scanned with CamScanner